सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२.

# महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, १९५६

(दिनांक १० जानेवारी २००६ पर्यंत सुधारलेला)

# Bombay Act No. LII of 1956.

# The Maharashtra Legislature Members (Removal of Disqualifications) Act, 1956

(*As modified upto the 10th January 2006*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

(किंमत : रु. ३.००)

# महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम, १९५६

---

## अनुक्रमणिका


**उद्देशिका.**

**कलमे.**

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. विवक्षित निरर्हता दूर करणे.

३. तात्पुरत्या तरतुदी.

४. व्यावृत्ती.

**अनुसूची एक.**

**अनुसूची दोन.**


---

(शा.म.मु.) एच ४०१४ (५,०६७–९-०६)

# सन १९५६ चा मुंबई अधिनियम ५२[1]

## [2][महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम.]

(या अधिनियमास दिनांक १२ डिसेंबर, १९५६ रोजी राज्यपाल यांची संमती मिळाली आणि तो **मुंबई शासन राजपत्र**, भाग चार मध्ये १७ डिसेंबर, १९५६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आला.)

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियमाद्वारे अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.
सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.
सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.
सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.
सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.
सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० तसेच सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९.
सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ (२६–१–१९७५)†
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (५–१२–१९७७)†
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ (२६–१२–१९७७)†
सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.
सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ (२४–११–१९८०)@
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ (२०–७–१९८१)†$
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ (२९–७–१९८१)†$$
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (३०–१२–१९९३)†££§
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ (८–६–१९९५)†**
सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ (१५–१२–१९९९)†***

---

[1]उद्देश व कारणे याच्या निवेदनाकरिता **मुंबई राजपत्र,** १९५६, भाग पाच, पृष्ठे ३४५–४६ (इंग्रजी) पहा.

[2]सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या अनुसूची अन्वये " मुंबई विधानसभा व मुंबई विधानपरिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

†ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ हा, सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ च्या कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

$सन १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ हा, सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ च्या कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

$$सन १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ हा, सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ च्या कलम ६ अन्वये निरसित करण्यात आला.

££सन १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ हा, सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ च्या कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

§सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ चे कलम ३ खालीलप्रमाणे वाचावे :—

शंका निरसन. "३ शंका निरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाच्या कार्यकारी अध्यक्षाचे पद हे जोवर राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील लाभप्रद असेल तोवर, असे पद धारण करणारी व्यक्ती, तिने राज्य शासनाने पुरविलेल्या भाडेमुक्त निवासी जागा, निवासाच्या व कार्यालयाच्या जागेत दूरध्वनी, शोफर असलेली मोटारगाडी व शासकीय दौऱ्यांसाठी केलेल्या प्रवासासाठी प्रवासभत्ता व दैनिक भत्ता यांसारख्या सुविधांचा लाभ घेतलेला असला तरीही, महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य होण्यास निरर्ह ठरणार नाही किंवा केव्हाही निरर्ह ठरली नव्हती असे मानण्यात येईल."

†**सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ हा, सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ च्या कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

†***सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा, सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ च्या कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

**[1][महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषद] यांचा सदस्य म्हणून निवडला जाण्याच्या व सदस्य म्हणून असण्याच्या बाबतीतील विवक्षित निरर्हता दूर करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** भारताच्या संविधानात, भारत सरकारचे किंवा उक्त संविधानाच्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही राज्य शासनाचे लाभपद धारण केल्याने ते धारण करणारी व्यक्ती, राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास व सदस्य असण्यास निरर्ह ठरत नाही असे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे जाहीर करण्याबद्दल तरतूद करण्यात आलेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** असे जाहीर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नांव व प्रारंभ.

**१.** [1][(१) या अधिनियमास, '' महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम '' असे म्हणावे.]

(२) तो, दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

विवक्षित निरर्हता दूर करणे.

**२.** एखादी व्यक्ती, यासोबत जोडलेल्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या अधिकार पदांपैकी कोणतेही पद धारण करते याच केवळ कारणावरून [2][महाराष्ट्र विधानसभेचा] किंवा [3][महाराष्ट्र विधान परिषदेचा] सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा सदस्य असण्यास निरर्ह ठरणार नाही.

तात्पुरत्या तरतुदी.

**३.** शंका निरसनार्थ, यावरून असे जाहीर करण्यात येत आहे की, राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ च्या कलम २८ अन्वये किंवा कलम ३४ अन्वये मुंबई विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडून आली आहे किंवा निवडली गेली आहे असे समजण्यात आलेली व्यक्ती, जे पद धारण केल्यामुळे ते धारण करणारी व्यक्ती राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा निवडला जाण्यास किंवा राज्य विधानमंडळाचा सदस्य असण्यास निरर्ह ठरत नाही. ते लाभपद आहे असे दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाद्वारे किंवा दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याद्वारे जाहीर केलेले पद धारण करते. एवढ्याच केवळ कारणावरून ती विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा निवडला जाण्यास किंवा विधानमंडळाचा सदस्य असण्यास निरर्ह ठरणार नाही.

१९५६ चा ३७.

व्यावृत्ती.

**४.** मुंबईचा विधानमंडळाच्या सदस्यांबाबत (अपात्रता दूर करण्याबाबत) अधिनियम, १९५१ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

१९५१ चा मुंबई २५.

## अनुसूची एक*

(कलम २ पहा)

१. [4][महाराष्ट्र शासनाच्या] मंत्र्यांच्या संसद सचिवांचे अधिकार पद.

२. शासकीय महाविद्यालयात अंशकालिक काम करणाऱ्या प्राध्यापकाचे किंवा अधिव्याख्यात्याचे अधिकार पद.

३. राष्ट्रीय छात्रसेना, प्रादेशिक सेना, वायुसेना, राखीव दल आणि साह्यकारी हवाई दल यातील कोणतेही अधिकार पद.

---

[1]सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ चा अनुसूची अन्वये '' मुंबई विधानसभा व मुंबई विधानपरिषद '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये '' मुंबई विधानसभा '' या मजकुराऐवजी सदर मजकूर दाखल करण्यात आला.

[3]वरील आदेशान्वये '' मुंबई विधानपरिषद '' या मजकुराऐवजी सदर मजकूर दाखल करण्यात आला.

[4]महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये '' मुंबई सरकारच्या '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ चे कलम ६(४) देखील पहावे.

४. होमगार्डमधील कोणतेही अधिकार पद.

५. राज्य शासनाच्या प्राधिकाराअन्वये किंवा प्राधिकाराखाली घटित करण्यात आलेल्या ग्रामसंरक्षण दलातील (मग ते कोणत्याही नावाने ओळखण्यात येत असो) कोणतेही अधिकार पद.

[१][ * * * * *]

७. राज्य शासनाने घटित केलेल्या जिल्हा किंवा प्रादेशिक विकास मंडळांच्या (मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) सचिवांचे अधिकार पद :

परंतु, असे अधिकार पद धारण करणाऱ्यांनी राज्य शासनाचे इतर कोणतेही लाभपद धारण केलेले नसावे.

१९५६ चा ९. ८. आयुर्विमा (निकडीच्या तरतुदी) अधिनियम, १९५६ अन्वये ज्याच्या नियंत्रित धंद्याची व्यवस्था, केंद्र सरकारकडे निहित झालेली आहे अशा विमाकाराच्या अधिकारातील कोणतेही अधिकार पद.

१९५६ चा ९. **स्पष्टीकरण**.—या नोंदीच्या प्रयोजनाकरिता " नियंत्रित धंदा " व " विमाकार " या संज्ञांचे, त्यांना आयुर्विमा (निकडीच्या तरतुदी) अधिनियम, १९५६ मध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

९. शासकीय व्यवस्थेखालील रुग्णालयातील मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्याचे किंवा मानसेवी सहायक वैद्यकीय अधिकाऱ्याचे अधिकार पद.

[२][९क. कोणत्याही सहकारी संस्थेच्या, (सहकारी संस्थांच्या नोंदणीच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये जी नोंदविलेली असेल किंवा जी नोंदविण्यात आली आहे असे समजण्यात आले असेल अशा सहकारी संस्थेच्या) समितीच्या अध्यक्षांच्या किंवा सदस्यांच्या अधिकार पदावर राज्य शासनाकडून नेमणूक करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशा समितीच्या अध्यक्षांचे किंवा सदस्यांचे अधिकार पद किंवा परिसमापकाच्या किंवा सहपरिसमापकाच्या कोणत्याही अधिकारपदावर सहकारी संस्थांच्या निबंधकाकडून नेमणूक करण्यात आली असेल त्या बाबतीत, असे परिसमापकाचे किंवा सहपरिसमापकाचे पद, किंवा निबंधकाने नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचे पद–मग अशा व्यक्तीची व्यक्तिशः नेमणूक करण्यात आली, किंवा त्याची नामनिर्दिष्ट व्यक्तींच्या मंडळावर नेमणूक करण्यात आलेली असो.]

१०. मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ अन्वये घटित केलेल्या [३][कामगार कल्याण मंडळाच्या] सभापतीचे किंवा सदस्याचे अधिकार पद. १९५३ चा मुंबई ४०.

[४][१०क.] महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ याच्या [५][कलम ४, पोट-कलम (१) चा खंड (घ), (ङ), (च), (छ) किंवा (ज)] अन्वये नामनिर्देशित केलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्यांचे अधिकार पद, तो असे अधिकार पद धारण करतो केवळ याच कारणामुळे असे अधिकार पद. १९६२ चा महा. ३.

---

[१]सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम ३ अन्वये, नोंद ६ वगळण्यात आली.

[२]सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ च्या कलम ३ अन्वये नोंद क्रमांक ९क समाविष्ट करण्यात आली.

[३]महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई कामगार कल्याण मंडळ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ६९ अन्वये नोंद १०क दाखल करण्यात आली.

[५]सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ५ अन्वये " उप-कलम (१) चे खंड (ब), (क) व (ड) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][१०ख. मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० अन्वये घटित केलेल्या महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग
१९६० चा मुंबई २१. मंडळाच्या किंवा महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग परिषदेच्या सदस्यांचे (अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य-सचिव धरून) अधिकार पद किंवा त्या अधिनियमांन्वये घटित करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या सदस्याचे अधिकार पद.]

११. केंद्र किंवा राज्य शासनाने नेमलेल्या कोणत्याही समितीच्या किंवा संस्थेच्या सभापती किंवा सदस्याचे अधिकार पद :

परंतु, अशा समितीच्या किंवा संस्थेच्या सभापती किंवा कोणत्याही सदस्यास पूरक भत्त्याखेरीज इतर कोणतेही पारिश्रमिक मिळता कामा नये.

**स्पष्टीकरण.**—या नोंदीच्या प्रयोजनाकरिता " पूरक भत्ता " या संज्ञेचा अर्थ, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा अधिकार पद धारकास, अशा अधिकार पदाचा धारक म्हणून समितीच्या किंवा संस्थेच्या सभेस हजर राहण्यासाठी किंवा कोणतीही इतर कामे करण्यासाठी त्यास झालेला व्यक्तिगत खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठी दिलेला इतर भत्ता, असा आहे.

[२][१२. केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने किंवा संघ लोकसेवा आयोगाने किंवा

[३][महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने] घेतलेल्या कोणत्याही परीक्षेसाठी परीक्षकाचे अधिकार पद.

१९४८ चा ३४. १३. राज्य कामगार विमा अधिनियम, १९४८ अन्वये विमेदारास वैद्यकीय लाभ मिळण्याची तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमान्वये धारण केलेली पुढील अधिकार पदे :—

(क) विमा वैद्यक व्यवसायी याचे अधिकार पद ;

(ख) राज्य कामगार विमा महामंडळाने किंवा राज्य शासनाने स्थापन केलेले रुग्णालय, दवाखाना, शुश्रूषागृह, प्रसूतिगृह किंवा इतर परिसंस्था यांतील अंशकालिक काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे किंवा तज्ज्ञाचे अधिकारपद, आणि

(ग) राज्य कामगार विमा महामंडळाने किंवा राज्य शासनाने विमेदारांना वैद्यकीय लाभ मिळण्याची तरतूद करण्यासाठी मान्यता दिलेल्या कोणत्याही खाजगी रुग्णालयात, दवाखान्यात, शुश्रूषागृहात, प्रसूतिगृहात किंवा इतर परिसंस्थेत त्या प्रयोजनासाठी नेमलेल्या वैद्यक व्यवसायी याचे अधिकार पद.]

[४][१४. राज्य शासनाने नेमलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस आयोगाच्या सभापती किंवा सदस्याचे अधिकार पद.]

१९७७ चा महा. २८. [५][१५. महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ याअन्वये घटित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सदस्यांचे (त्याचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांसह) किंवा त्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांच्या सदस्याचे (त्याच्या सभापती किंवा उप सभापतीसह) किंवा त्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही पंचायतीच्या सदस्याचे (सरपंच आणि उप सरपंच यांसह) अधिकार पद, केवळ तो असे अधिकार पद धारण करतो म्हणून]

---

[१]सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम ३९ अन्वये नोंद १०ख दाखल करण्यात आली.

[२]सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२ च्या कलम २ अन्वये नोंदी १२ व १३ दाखल करण्यात आल्या.

[३]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई लोकसेवा आयोगाने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या कलम २ अन्वये नोंद १४ दाखल करण्यात आली.

[५]सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम १९२ अन्वये मूळ नोंदीऐवजी ही नोंद दाखल करण्यात आली.

[१][१६. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये घटित करण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या किंवा या अधिनियमान्वये घटित करण्यात आलेल्या त्याच्या कोणत्याही समित्यांच्या किंवा मंडळाच्या सदस्याचे (सभापती किंवा उप सभापती यांसह) अधिकार पद.] १९७५ चा महा. ४.

[२][१७. राज्य शासनाने घटित केलेल्या महाराष्ट्र राज्य विधि आयोगाच्या सभापतीचे किंवा सदस्याचे अधिकार पद.]

[३][१८. मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये घटित केलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या किंवा त्या अधिनियमान्वये घटित केलेल्या त्याच्या कोणत्याही समित्यांच्या सदस्यांचे (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांसह) अधिकार पद ]. १९५० चा महा. ६४.

[४][१९. या अनुसूचीतील वरीलपैकी कोणत्याही नोंदीमध्ये ज्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही आणि ज्यावरील नेमणूक ही राज्य शासनाकडून करण्यात येते अशा, राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा राज्य शासनाकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या कोणत्याही अन्य महामंडळाच्या, संचालक मंडळाच्या (मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो.) अध्यक्षाचे, उपाध्यक्षाचे किंवा कोणत्याही अन्य सदस्याचे अधिकार पद.]

**स्पष्टीकरण.**—या नोंदीच्या प्रयोजनांसाठी.—

(१) " महामंडळ " या संज्ञेचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा असेल व त्यात संस्था नोंदणी अधिनियम, १८६० हा महाराष्ट्र राज्यात लागू असताना, त्या अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेचा किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेल्या कोणत्याही संस्थेचा समावेश होईल ; १८६० चा महा. २१.

(२) " राज्य शासनाकडून नियंत्रित केले जाणारे महामंडळ " या शब्दप्रयोगात, ज्या महामंडळाच्या भरणा झालेल्या भाग-भांडवलाच्या कमीत कमी पंचवीस टक्के भाग-भांडवल राज्य शासनाने धारण केलेले असेल त्या महामंडळाचा समावेश होईल.

[५][२०. महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाच्या कार्यकारी अध्यक्षाचे अधिकार पद.]

[६][२१. राज्य शासनाने घटित केलेल्या स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीच्या सभापतीचे अधिकार पद.]

[७][२२. महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र याकरिता राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४ या अनुसार काढलेल्या विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र याकरिता विकास मंडळे आदेश, १९९४, या अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांनी स्थापन केलेले विदर्भ विकास मंडळ, मराठवाडा विकास मंडळ, आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ यांच्या अध्यक्षांची अधिकार पदे. "]

## अनुसूची दोन

(कलम ३ पहा)

(१) हैदराबाद विधानसभा (निरर्हता निवारण) अधिनियम, १९५५
(सन १९५५ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक १८)

(२) मध्यप्रदेश लाभपद (निरर्हता दूर करण्याबाबत) अधिनियम, १९५०
(सन १९५० चा मध्यप्रदेशाचा अधिनियम क्रमांक ७)

(३) सौराष्ट्र विधानसभा (निरर्हता निवारण) अधिनियम, १९५०
(सन १९५० चा सौराष्ट्राचा अधिनियम क्रमांक ६)

(४) राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ (सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ३७) याचे कलम २८(५).

---

[१]सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ च्या कलम १० (२) अन्वये नोंद १६ समाविष्ट करण्यात आली.
[२]सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम २ अन्वये नोंद १७ समाविष्ट करण्यात आली.
[३]सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ च्या कलम २ अन्वये नोंद १८ समाविष्ट करण्यात आली.
[४]सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ च्या कलम २ अन्वये नोंद १९ समाविष्ट करण्यात आली.
[५]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ च्या कलम २ अन्वये नोंद २० समाविष्ट करण्यात आली.
[६]सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ च्या कलम २ अन्वये नोंद २१ समाविष्ट करण्यात आली.
[७]सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ च्या कलम २ अन्वये नोंद २२ समाविष्ट करण्यात आली.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई